# स्वातंत्र्य चळवळीतील दलित स्त्रियांचे योगदान

**प्रा. अश्विनी रामचंद्र खवळे**

सहाय्यक प्राध्यापिका

विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर ( स्वायत्त )

**प्रस्तावना :**

इतिहास म्हणजे एका व्यक्तीची शौर्यगाथा नव्हे तर सामान्य माणसांनी असामान्य कर्तुत्व दाखवून आणलेले व्यवस्था परिवर्तन होय. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी देशातील अनेक ज्ञात अज्ञात स्वातंत्र सैनिकांनी हौतात्म्य स्वीकारले आहे. अक्षरश असंख्य स्वातंत्र सैनिकांना त्यासाठी जन्मठेप ,फाशी , काळया पाण्याची शिक्षा भोगाव्या लागल्या आहेत तरीही त्यांनी इंग्रजांविरोधात संघर्ष चालू ठेवला. सुदैवाने या स्वातंत्रसैनिकापैकी अनेकांचा इतिहास उपलब्ध आहे.

भारतीय स्वातंत्र चळवळीचे आणखी एक विशेष महत्वाचे वैशिष्टे भारतीय महिलांचा स्वातंत्र चळवळीतील सहभाग होय. देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात स्त्रियांनी सहभाग घेणे ही नव्या युगाची नांदी ठरला. तसेच ज्या स्त्रियांनी पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून लढा दिला त्यांचे योगदान आज विस्मृतीत जात आहे. भारतीय स्वातंत्र चळवळ ही त्या काळातील एक व्यापक चळवळ होती. त्यामध्ये समाजातील प्रत्येक घटकांचा समावेश होता यामध्ये लाखो स्त्री-पुरुष , गरीब- श्रीमंत , जात-पात , उच्च-कनिष्ट असे भेद विसरून सर्वांनी या आंदोलनामध्ये सहभाग घेतला होता. आणि यामुळे ब्रिटिशाना पराभव पत्करावा लागला लागून १५ ऑगस्ट १९४७ मध्ये भारतीयांना स्वातंत्र्य बहाल करून मायदेशी परतावे लागले. या आंदोलनामध्ये स्त्रियांचाही लक्षणीय सहभाग दिसून आला. परंतु इतिहाससुद्धा बऱ्याचदा उच्च वर्गातील स्त्रियांच्या सहभागापुरता मर्यादित राहिला म्हणूनच त्याला वरिष्ट वर्गातील स्त्रियांचा इतिहास (History from Above) असे म्हटले जाते. दलित , कामगार , शेतकरी , महिलांनी सुद्धा या चळवळीमध्ये सहभाग प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष स्वरुपात नोंदवला. परंतु त्यांचा इतिहास लिहिला गेला नाही. पुरेशी साधने उपलब्ध नसल्याने तो उपेक्षितच राहिला

**महत्वपूर्ण शब्द :** भूमिगत , सत्याग्रही, वीरांगना, सबाल्टन इ.

**उद्देश :**

भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये अनेक शूर दलित स्त्रियांनी सहभाग घेतला होता. परंतु तत्कालीन उच्चवर्णीय समाजाकडून हेतुपूर्वक त्यांच्या कार्याची दखल घेण्यात आलेली नाही व त्यांची नोंद ही फारशी उपलब्ध नाही म्हणून त्यांचे कार्य व बलिदान आपणास नाकारता येणार नाही. अस्पृश्य म्हणून वागणूक मिळत असताना आणि आयुष्यात सतत गुलामगिरीच्या अनुभवांना सामोरे जावे लागत असूनही दलित स्त्रियांनी निस्वार्थी बुद्धीने आणि कधी प्राणाचे मोल देऊन ही भारतीय राष्ट्रवादाच्या जडणघडणीला हातभार लावलेला आहे. अशा अनेक ज्ञात व अज्ञात दलित स्त्रियांचे स्वातंत्र्य चळवळीतील कार्य व त्यासाठी त्यांनी दिलेले बलिदान यावर प्रकाशझोत टाकता यावा हा या शोधनिबंधाचा उद्देश आहे.

**१८५७ च्या उठावात झलकारीबाईंचे योगदान :**

हिंदुस्थानच्या इतिहासामध्ये १८५७ च्या उठावाचे एक वेगळेच महत्व आहे. ब्रिटिशानी संपूर्ण भारताच्या एकसंघ निर्मितीसाठी भारतात अनेक सुधारणा घडवून आणण्यास सुरुवात केली यासाठी त्यांना स्थानिक संस्थांनी व जनता यांच्याशी संघर्ष करावा लागला आणि या संघर्षात संस्थानिकांसोबत सामान्य जनताही सहभागी झाली.१८५७ च्या उठावात ज्या प्रकारे झाशीच्या राणी लक्ष्मीबाईच्या शौर्याचे दर्शन झाले त्याच प्रकारे राणीच्या उभारलेल्या पलटण ची प्रमुख वीरांगना झलकारीबाई

हिचेही नाव घ्यावे लागेल. वेलस्लीच्या तैनाती फौजेमुळे स्थानिक सत्ताधीश दुबळे बनले तसेच लॉर्ड डलहौशीच्या खालसा धोरणामुळे भारतातील अनेक संस्थाने खालसा करण्यात आली. ब्रिटिशानी अनेक संस्थाने खालसा केली होती त्यापैकी झाशी एक संस्थान होय. १८५७ च्या झालेल्या उठावात झाशीच्या राणीने सहभाग घेतला. १८५७ च्या पहिल्या स्वातंत्र्यसंग्रामात आपले अमूल्य योगदान देऊन केवळ भारताच्या दलित , शुद्र जातीतच नव्हे तर भारताच्या इतिहासात झलकारीबाईने संपूर्ण हिंदुस्थानात तसेच स्त्रीजातीच्या स्त्रीशक्तीचा गौरव वाढवला आहे.

डॉ. शोभा शिरढोणकर यांनी ' झाशीची वीरांगना झलकारीबाई' या पुस्तकात दिलेल्या माहितीप्रमाणे दिल्लीतून प्रसिद्ध होणाऱ्या हिंदी दैनिक नवभारत टाइम्स २००७ ला लिहिले की , १८५७ च्या संग्रामामध्ये अनेक वीर होते ज्यांनी योगदान दिले त्यात अशी एक वीरांगना होती तिचे नाव झलकारीबाई होते. झलकारीबाई सर्वसामान्य घरातून मोठी झाली असली तरी प्रामाणिक आणि शूरत्वाची अनन्यसाधारण मिसाल होती. तिने स्वतःच्या प्राणांची पर्वा न करता झाशीची राणी लक्ष्मीबाईंचे प्राण वाचवले इतिहासात अशी उदाहरणे विरळच राष्ट्रकवी मैथिलीशरण गुप्ता यांनी तिच्या शौर्यावर सुंदर काव्य रचले आहे .

" जाकर रण में ललकारी थी, वह झांशी की झलकारी थी।

गोरो को लडना सिखा गई रानी मन जौहार दिखा गई।

इतिहास में झलक रही। वह भारत की सनरी थी। "

सर ह्यु रोज ह्याने झलकारीबाईंचे शौर्य पाहून म्हणाला " If one percent of Indian women become so mad is this girl is be will have to leave all that we have in this country." यावरूनच आपणास तिच्या शौर्याविषयी कल्पना येते. वीरांगना झलकारीबाईच्या महत्वपूर्ण कार्याकडे इतिहासाने डोळेझाक केलेली आहे. इंग्रजांनी जेव्हा झाशी किल्याला घेरले त्यावेळी झलकारीबाई अत्यंत शौर्याने लढली. इंग्रजांशी झुंज चालु ठेवली. झाशीच्या राणी लक्ष्मीबाईप्रमाणे हुबेहूब दिसणारी झलकारीबाई आहे हे शेवटपर्यंत इंग्रजांना समजले नाही. तिने आपल्या सर्वस्वाचे बलिदान देऊन आपल्या राणीच्या प्राणांचे रक्षण केले.प्रसंगी आत्मबलिदान देण्यासही तिने मागेपुढे पहिले नाही मात्र तरीही तिची इतिहासाने पुरेशी नोंद घेतलेली नाही.

**२ ) उदादेवी :**

१६ नोव्हेंबर १८५७ मध्ये लखनौमधील सिकंदी बाग याठिकाणी इंग्रजांना हैराण करून सोडणारी आणखी एक दलित वीरांगना म्हणजे उदादेवी होय. तिच्या शौर्याची , धाडसाची , रणकौशल्याची स्तुती खुद्द मार्क्स व इंग्रज इतिहासकारांनीसुद्धा केलेली आपणास पहावयास मिळते.

मौलवी अहमदुल्ला शाहच्या नेतृत्वाखाली इंग्रजांविरोधात झालेल्या युद्धात हेनरी लॉरेन्स मैदानावरून पळून गेला. परंतु झालेल्या युद्धात उदादेवीचा पती मक्का पासी यास वीरमरण आले. पती शहीद झाल्यानंतर उदादेवीने हार न मानता स्वतः स्वातंत्र्यसंग्रामात भाग घेतला. वाजीद अलीला कारावासाची शिक्षा मिळाल्यानंतर स्वतंत्रता संग्रामाचे नेतृत्व बेगम हजरत महल व बेगम सिकंदर महल यांनी केले. १८५७ मध्ये त्यांनी एक बटालियन उभी केली आणि त्याची प्रमुख म्हणून उदादेवी होती.तिने इंग्रजांशी शौर्याने मुकाबला केला तसेच इंग्रज सैनिकांना मारले. त्यांच्यातील एक इंग्रज सैनिक चिकर वालेस याने उदादेवीस गोळी घातली व ती धारातीर्थी पडली. त्याला जेव्हा समजले तेव्हा तो म्हणाला जर मला जनतेमधून शहीद होणारा पुरुष नसून स्त्री होती समजले असते तर मी स्वतः हजार वेळा मेलो असतो परंतु देशासाठी कुर्बानी देणाऱ्या या साहसी स्त्रीला कधीही मारले नसते.यावरूनच तिच्या एकूण शौर्याविषयी माहिती मिळते.

**३) महावीरी देवी :**

पश्चिमी उत्तर प्रदेशमधील मुज्जफरनगर येथे एका विरांगनेचा जन्म झाला ती म्हणजे महावीरी देवी. जिने स्वातंत्र्यसंग्रामामध्ये स्वतःच्या प्राणांचे बलिदान दिले. तिच्या साहसाचे कारनामे तेथील लोक गीतांमधून करतात.

" चमक उठी सन ५७ में वह तलवार पुराणी थी ।

महावीरी भंगण थी ,बडी मरदानी ।"

**४ ) चंपूताई गणपतराव बनसोड :**

महाराष्ट्रातूनही विविध प्रांतामधून अनेक दलित स्त्रियांनी स्वातंत्र चळवळीत भाग घेण्यास सुरुवात केली. १९३० च्या कायदेभंग चळवळीमध्ये चंपूताई बनसोड या दलित स्त्रीने सहभाग घेतला होता यासाठी त्यांना ६ महिने तुरुंगवास व सक्त मजुरीची शिक्षा भोगावी लागली.

**५ ) गोपिकाबाई फुलझेडे :**

१९३२ च्या चळवळीमध्ये यांनी भाग घेतला होता मुलाच्या चंदपूर जिल्ह्यातील असलेल्या गोपिकाबाई दारूच्या गुत्यासमोर निदर्शने केल्याबद्दल शासनाने त्यांना ३ महिन्यांच्या कारावासाची शिक्षा ठोठावली.

**६ ) शांताबाई भालेराव :**

महात्मा गांधीच्या नेतृत्वाखाली झालेल्या १९४२ च्या लढ्यात यांनी सहभाग घेतला होता . यांचे वडील डॉ. आंबेडकरांचे जवळचे कार्यकर्ते मानले जातात. शांताबाईना ' दादाभाई नौरोजी' या विषयावर सुवर्ण पदक मिळाले होते. त्यांनी केलेल्या कार्याविषयी माहिती सांगितली आहे त्यात लपून छपून चिठ्या पुरवणे ,पोस्ट ऑफिस, चौक्या जाळणे यांसारखे कार्य करत असू. महात्मा गांधी व डॉ आंबेडकर यांच्या चळवळीविषयी माहिती देताना म्हणाल्या " म. गांधींच्या चलेजाव चळवळीत अहिंसेबरोबरच कधी कधी हिंसेचाही वापर केला जात होता. जाळपोळ दगडफेक असे आक्रमक कार्यक्रम आम्ही वारंवार हाती घेत असू गांधीजींचा अर्थात यासर्वास विरोध होता परंतु कार्यकर्ते ऐकत नसत मात्र आंबेडकरांच्या चळवळी मात्र अहिंसात्मक तत्वावर आधारलेली होती.कार्यकर्ते सहनशीलतेचा , संयमाचा मार्ग स्वीकारून चळवळीमध्ये भाग घेत होते.

**७ ) ताराबाई शंकर कांबळे :**

भारतभर झालेल्या १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात यांनी भाग घेतला होता तसेच त्यांनी भूमिगत झालेल्या स्वातंत्र सैनिकांना आश्रय देऊन त्यांना मदत केली होती.

**९ ) शकुंतला रघुनाथ भालेराव :**

शकुंतला भालेराव यांनी आपले वडील नाना कोंडगी त्रिभुवन यांच्यासोबत निरनिराळ्या निदर्शनात हिरीरीने भाग घेतला होता.

**१० ) धुलीबेन सोळंकी व सोनल सोळंकी :**

'कॉन्ट्रीब्युशन मेड बाय ऑर्डीनरी मेन अंड विमेन टू फ्रीडम मुवमेंट ऑफ आवर कंट्री' या शीर्षकाच्या गांधीशिक्षण भवनाने प्रकाशित केलेल्या पुस्तकात दलित व दलितेत्तर स्वातंत्र सैनिकाविषयी माहिती आहे. श्रीमती कुसुम मुजुमदार या स्वातंत्रसैनिकाने मुलाखतीमध्ये आपल्याबरोबर दलित जातीतील स्त्रियाही सहभागी होत्या त्यापैकी धुलीबेन सोळंकी व सोनल सोळंकी यांचाही सहभाग होता.

**मूल्यमापन :**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये समाजातील सर्व घटकांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या सहभाग घेतला होता परंतु इतिहासात उच्चवर्णीय समाजाचीच नोंद घेण्यात आली. समाजातील तळागाळातील लोकांनीसुद्धा योगदान दिलेले असले तरी त्याची फारसी दखल घेण्यात आली नाही. भारतीय इतिहास उच्चवर्णीय स्त्रियांच्या कार्यासाठीच चूप आहे तर दलित स्त्रियांची तेथे कोण नोंद घेणार ? उपेक्षित घटकांचा विचार सर्वप्रथम सबाल्टून स्टडिज यांनी मात्र थोड्या बहुत प्रमाणात सुरु केली. तत्कालीन समाजातील सर्वात शोषक घटक म्हणजे दलित स्त्री होय. तिला दुहेरी शोषणाला सामोरे जावे लागत होते ते म्हणजे सर्वात आधी ती एक दलित होती आणि दुसरे म्हणजे तिचे स्त्री असणे.

दलित स्त्रिया ह्या फक्त स्वातंत्र्य चळवळीमध्येच सहभागी नव्हती तर त्या समाजात असलेल्या विषम परिस्थिती म्हणजेच जातीप्रथा, अस्पृश्यता, दुसऱ्यांचे गुलाम म्हणून राहण्याची प्रथा या सर्व कुरीतीविरोधात लढा देण्याचे ही कार्य त्यांनी केलेले आहे. १८५७ पासून ते अगदी भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यंत अनेक स्त्रियांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या लढा दिलेला आहे , आत्मबलिदान केलेले आहे तरीही भारतीय स्वातंत्र्यलढ्यात सर्वस्व पणाला लावूनही इतिहासात त्यांची योग्य ती दखल घेण्यात आली नाही तसेच त्यांच्याबद्दलची बरीच पुस्तके पहिली परंतु असमाधानकारकता जाणवते.तसेच भारतीय समाजातील सर्वात खालच्या स्तरातील असूनही दलित स्त्रियांचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील योगदान लक्षणीय आहे तरीही भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील त्यांच्या योगदानाची पुरेशी दखल भारतात अद्याप घेतली गेलेली नाही.

**संदर्भसूची :**

१) मोदी नवाझ , भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रिया, अनुवाद – फडके वासंती, मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे ,२००८

२ ) डॉ. पाटील पदमजा, भारतीय इतिहासातील स्त्रिया, फडके प्रकाशन, कोल्हापूर ,२०११

3) डॉ. शिरढोणकर शोभा, झाशीची वीरांगना झलकारीबाई, स्वरूप प्रकाशन, पुणे ,२०१७

४ ) श्री. झांबरे स.ध., महान भारतीय क्रांतिकारक, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ प्रकाशन ,मुंबई ,२००७

५) डॉ. गंगवार ममता, आधुनिक भारत की नारी ( ऐतिहासिक परिप्रेक्ष में ), साहित्य निलय प्रकाशन ,कानपूर ,२०११

६ ) येडेकर श्याम , भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील स्त्रियांचे योगदान, राजहंस प्रिंटींग प्रेस ,कोल्हापूर ,२००७